Vol 4 Issue 8 Feb 2015

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


### *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

### *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-8 | Feb-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# *शल्य शास्त्रज्ञ – सुश्रुत*

**सी.आर. पालकर**

संस्कृत विभाग प्रमुख , आ.पा.म.वि. यवतमाळ.

***सांराश*** : सुश्रुताचा सुश्रुत संहिता हा शल्यतंत्र विषयाचा सर्व समावेशक सुन्दर ग्रंथ आहे. आत्रेयाच्या उपदेशानुसार अग्निवेशांनी अग्निवेशतंत्राची रचना केली. त्यानंतर आचार्य चरकांनी त्याचे प्रतिसंस्करणा करून चरकसंहिता ग्रंथाची रचना केली. तसेच धन्वन्तरीच्या मूळउपदेशांना संग्रहीत सुश्रुताचार्यांनी सुश्रुततंत्राची निर्मिती केली तोच ग्रंथ जगात सुश्रुतसंहिता या नावाने प्रसिद्ध आहे. काही विद्वानांच्या मते असे मानले जाते की, उपलब्ध सुश्रुत संहिता सुश्रुत यांचे नावानी प्रसिद्ध आहे. परंतु ती सुश्रुत प्रणीत मुळ संहिता नसून वृद्ध सुश्रुतांनी रचित तसेच सुश्रुतांचा प्रतिसंस्कृत ग्रंथ आहे. परंतु मुळ संहितेमध्ये याचे कुठलेच प्रमाण उपलब्ध नाही.

***प्रस्तावना :***

विश्वामित्रं सुतं शिष्यमृणिं सुश्रुत मन्वशात्
विश्वामित्र सुतः श्रीमान् सुश्रुत परिपृच्छति ।
वैश्वामित्रं शशासाध शिष्यं काशीपतिमुनिः
ब्रहृमर्षि पुत्रं विनयोपन्नं शिष्यं शुभं सुश्रुत मन्वशातसः ।।

महाभारतामध्ये विश्वामित्रांच्या पुत्रांममध्ये सुश्रुताचे नांव आलेले आहे. विश्वामित्राद्वारा पुत्र सुश्रुत याला आयुर्वेद विद्याग्रहण करण्याकरिता धन्वन्तरिच्या जवळ पाठविण्याचा संदर्भ 'भावप्रकाश' ग्रन्थामध्ये सुद्धा आढळून येतो.

विश्वामित्रो मुनिस्तेषु पुत्रं सुश्रुतमुक्तवान् । वत्स !
वाराणसी गच्छत्वं विश्वेश्वरं वल्लभाम् ।। – (भावप्रकाश)

चक्रदन्त – 'अद्य परमकारूणिको विश्वामित्रसुतः शल्यप्रधानमायुर्वेदतन्त्रं प्रणेतुमारब्धवान्' । चक्रदन्त टिकेनुसार सुश्रुत विश्वामित्राचे पुत्र असून त्यांनी शल्यप्रधान आयुर्वेद तंत्राची निर्मिती केल्याचा संदर्भ दिसून येतो.

वरिल संदर्भावरून सुश्रुत हे विश्वामित्रांचे पुत्र होते. परंतु प्राचीन साहित्यात विश्वामित्र अनेक आढळून येतात. उदा. ऋग्वेदातील अनेक मन्त्रांचे द्रष्टा विश्वामित्र आहेत. तसेच भगवान रामांना धनुर्विद्या शिकविणारे महर्षि हे देखिल विश्वामित्रच होते. त्यामुळे सुश्रुतचे पिता विश्वामित्र आहे हे निश्चित करणे अशक्य आहे.

सुश्रुताचा काळ – सुश्रुतांचा काळ निश्चित करण्यांकरिता साधन उपलब्ध नाही. विश्वामित्र पुत्र सुश्रुत यांचा काळ बहुधा तोच असावा जो धन्वन्तरी शिवदास यांचा आहे. अर्थात् १००० ई.पू., कारण असे न मानल्यास गुरू व शिष्य यांच्यात विसंगती निर्माण होईल. परंतु काही विचारधारा यापेक्षा वेगळ्या सुद्धा आढळून येतात.

1. The Sushrut Samhita is a Sanskrit redaction text on surgery. The original work is attributed to Sushruta likely a historical physical from 6th century B.C. Pharmacy – Wikipedia Encyclopedia.
2. Sushurta the great sage surgeon, philosopher and teacher of ancient India. Sushrut belonged to a period between 600 and 800 B.C. – Natarajan K., Indian journal of plastic surgery/ med know publications 2313306 (pub med)

3. The exact period of Sushruta is unclear but most scholars put him between 600 to 1000 B.C.
S.Sarat, R. Parihar "Sushruta :- the first plastic surgeon in 600 B.C. the Internet Journal of Plastic Surgery – 2006 Volume 4 Number 2.
४. हर्वर गोवेन यांचे मतानुसार तर 'सुश्रुत' नावाचा कोणी व्यक्ती झालेलाच नाही व झाला असेल तर तो सॉक्रेटीसच्या व्यतिरिक्त दुसरा कोणीच नाही. – ए.हीस्ट्री ऑफ इंडियन मेडिसीन. पृ.१४४ – १४५
५. डॉ. मुखोपाध्याय च्या मतानुसार सुश्रुत काळ १००० ई.स.पू. आहे. – ए.हीस्ट्री ऑफ इंडियन मेडिसीन. पृ.५७६ – ५७८

सुश्रुत काळासंबंधीत विविध मतांचा विचार केला असता असे निदर्शनांस येते की, प्रत्येक विद्वान सुश्रुतांचा कालखंड हा ६०० ते ई.पू. ते १००० ई.पू. असा मानतात. यावरून लक्षात येते व स्पष्ट होते की, सुश्रुत हे बौद्ध काळाच्या पुर्वीचे होते.

महावीर व बौद्ध यांच्या अहिंसा तत्वामुळे अतिप्रगत अश्या शल्यतंत्राचा ऱ्हास झाला असावा अश्याप्रकारे भिन्न भिन्न विद्वानांच्या दृष्टिकोनातून तसेच आजच्या प्रगत युगातील देश-विदेशातील अनेक शल्यतज्ञाच्या आधुनिक विचारसरणीतून असे स्पष्टपणे दिसून येते की, सुश्रुत संहितंचा काळ आजपासून २६०० वर्ष पुर्वीचा होता.

सुश्रुत संहितेवर अनेक टिका अनेक विद्वानांनी लिहील्या आहे ज्यापैकी काही अनुपलब्ध, काही अप्रकाशित आहेत.

### *सुश्रुत संहिता विषय व विभाग –*

सुश्रुत संहिता ग्रंथाचे मुख्य प्रयोजन ''व्याध्युपसृष्टानां व्याधिपरिमोक्षः स्वस्थस्य रक्षणस्य ।''

रोगांनी व्याप्त मनुष्यांना रोगापासून मुक्ती देणे तसेच स्वस्थ व्यक्तीच्या स्वास्थ्याचे रक्षण करणे हेच प्रमुख प्रयोजन आहे. सुश्रुतांनी संहितेच्या स्वरूपात १२० अध्यायाच्या विशाल ग्रंथाची निर्मिती केली. उर्वरित विषयांचे वर्णन उत्तरतंत्रात ६६ अध्यायाच्या स्वरूपात दिसून येते.

१.सूत्रस्थान – ४६ अध्याय
२.निदान स्थान – १६ अध्याय
३.शरीरस्थान – १६ अध्याय
४.चिकीत्सास्थान – ४० अध्याय
५.कल्पस्थान – ०८ अध्याय

१.सूत्रस्थान – सुश्रुत संहितेत सूत्रस्थान प्रथम स्थान असून इतर सर्व स्थानांपेक्षा जास्त म्हणजे एकूण ४६ अध्याय आहे. या स्थानाला सूत्रस्थान असे संबोधले आहे. कारण या स्थानामध्ये चिकीत्साशास्त्राला बिजरुपाने प्रदर्शित केले आहे.
२.निदानस्थान – या एकूण १६ अध्याय आहे. निदानस्थानामध्ये मुख्यतः प्रमुख रोगांचे वर्णन केले आहे. निदान याचा अर्थ रोगाचे कारण, निदानस्थानामध्ये प्रमुख रोगांच्या निदानांचे वर्णन केले आहे.
३.शारीरस्थान – शारीरस्थानात एकूण १० अध्याय आहेत. या स्थानामध्ये सृष्टिक्रम व शरीररचना या विषयांचे वर्णन केलेले आहे.
४.चिकीत्सास्थान – यामध्ये एकूण ४० अध्याय असून चिकीत्सेचे वर्णन केले. रोगनाशाकरिता उपाय सांगितले आहेत.
५.कल्पस्थान – यात एकूण ४ अध्याय आहेत. यात सामान्य उपाययोजनांची माहिती सांगितली आहे.

उपलब्ध संस्कृत टिकापैकी प्रमुख टिकांचा खालीलप्रमाणे थोडक्यात उल्लेख करता येतो.

१. उल्हण टिका – सुश्रुत संहितेवरील अत्यंत महत्वपूर्ण तसेच प्रामाणिक व विश्वसनीय टिकांमध्ये उल्हणकृत 'निबंधसंग्रह' या टिकेस जाते. सुश्रुत संहितेवरील सर्व टिकांमध्ये निबंध संग्रह ही एकच टीका संपूर्ण उपलब्ध आहे व हीच टीका सुश्रुताच्या विचारांचे मर्म शोधून काढणारी, परिपूर्ण कृती मानली आहे. हि टिका सुश्रुत संहितेचे पूर्ववर्ती टिकाकार जेज्जट, माधव, सुक्रीर, सुधीर, सुचीर, नन्दी, वराह, गयदास, भास्कर, चक्रपाणी, कार्तिककुण्ड इ. च्या विचारांच्या आधारावर रचल्या गेली आहे.
२. चक्रपाणी टिका – यांची 'भानुमती टिका' सुद्धा प्रसिद्ध आहे. ती मात्र सश्रुतसंहितेच्या सूत्रस्थानावर लिहीलेली आहे. ही टिका जयपूर तसेच कलकत्याच्या गंगाप्रसाद सेन यांनी प्रकाशित केली.
३. हारायणचन्द्र टिका – बंगाल मधील एक यशस्वी शल्यचिकित्सक हारायणचन्द्र चक्रवर्ती यांनी सुश्रुतसंहितेवर 'सुश्रुतार्थसन्दिपन' नावाची टिका लिहली आहे.
४. गयदास टिका – यांची न्यायचन्द्रीका ही टिका प्रसिद्ध आहे. हि टिका सुश्रुतांच्या निदान स्थानावरच उपलब्ध आहे. या

टिकेला बृहद्पंजीका असे सुद्धा नामकरण आहे.
हिन्दी टिका – हिन्दी भाषेत उपलब्ध टिकेतील मुख्य टिका खालीलप्रमाणे आहेत –
भास्कर गोविंद घाणेकर टिका – सुश्रुत संहितेवरील टिकांमध्ये ही अत्यंत लोकप्रिय टिका आहे. घाणेकरांनी सूत्रस्थान, शरीरस्थानावर टिका लिहीली आहे.
अम्बिकादत्त शास्त्री – आयुर्वेद ग्रंथामध्ये सध्या सुश्रुतसंहितेवरील हा ग्रंथ, पूर्णरुपाने उतरतंत्रासह अत्यंत उपयुक्त आहे. चौखम्भा संस्कृत संस्थान वाराणसीद्वारा प्रकाशित झाला.
अत्रिदेव विद्यालंकारकृत – हिन्दी भाषेतील ही टिका अभ्यासकांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहे.
सुश्रुताचा 'सुश्रुतसंहिता' अत्यंत लोकप्रिय व महत्वपूर्ण ग्रन्थ असल्यामुळे अनेक देशी विदेशी भाषांमध्ये याचा अनुवाद झाला आहे.

### *इंग्रजी अनुवाद –*

१.हार्नले – १८६७ सूत्रस्थान १ ते १४ अध्यायापर्यंत
२.यू.सी.दत्त – १८८३ सूत्रस्थान १ ते २ अध्यायापर्यंत
३.ए.सी.चट्टोपाध्याय – १८६१ सूत्रस्थान १ ते ४६ अध्यायापर्यंत
४.कुंजीलाल भिषगरत्न – १६०७. ११ सु.सं.
५.जी.डी. सिंधल
६.The Vol. of "The Sushrut Samhita" by Kaviraj Kunjlal Bhishgratna is also available on Internet.
लॅटीन अनुवाद – प्रो. हेसलर (१६४४)
जर्मन अनुवाद – प्रा. वेल्लर्स
अरबी अनुवार – किताब–ए–सुसरुड (८ वी शती)
सुश्रुत भाषाशैली – सुश्रुत संहितेची भाषा सामान्य संस्कृत असून चरक संहितेप्रमाणेच गद्य व पद्य शैलीत आढळते, परंतु उतरतंत्रामध्ये केवळ पद्यच दिसून येते. सुश्रुतसंहितेच्या शैलीमध्ये औपनिषदिक पुट दृष्टीगत होतात. विषयाच्या विभिन्नतेमुळे उतरतंत्रामध्ये या शैलीचे निर्वहण दिसत नाही. या परिवर्तनावरून उल्हणाचार्यांनी उतरतंत्र नंतर जोडले आहे असे मानले आहे.

सुश्रुत संहितेची भाषा शुष्क असून गद्यामध्ये गम्भीरता, सरसता व मनोहर भाषा दिसून येत नाही. मन्त्रप्रयोग केला आहे तो सुद्धा सामान्य संस्कृतभाषेतच आहे. विषयाचे प्रतिपादन नियमानुसार सजवून व्यवस्थितरित्या केले आहे. अलंकाराचा उपयोग उच्चश्रेणीचा आहे.

सुश्रुतसंहिता हा ग्रंथ शल्यशास्त्राशी निगडीत असल्यामुळे व मनुष्याच्या आयुष्याला आधारभूत असल्यामुळे सुश्रुतांनी आप्रोपदेश व प्रत्यक्षप्रमाणाने सिद्ध अश्या सूत्रांची रचना केल्याची प्रचिती भाषाशैलीतून दिसून येते. सुश्रुताची अतिप्राचीन शास्त्रज्ञामध्ये गणना झाली आहे ती केवळ त्याच्या संशोधनामुळेच.

### *संदर्भ ग्रन्थ –*

१.च.सं.सू.अ. ३०/२३
२.कश्यपसंहिता – वि १/१०
३.भावप्रकाश पूर्व – १/१७
४.निरुक्त १–६
५.स्टडीज इन दी मेडिसीन ऑफ एन्सि.इंडिया पृ.१०६
६.महाभारत अनुशासनपर्व अ.४१५५
७.ऋग्वेद – ११६/१८



***सी.आर. पालकर***
संस्कृत विभाग प्रमुख , आ.पा.म.वि. यवतमाळ.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org